पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९२९          दि. ०६/०९/२०१९**

कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर्

विषयः-कोंढवा पोलीस ठाण्याचे हद्दीत विधीसंघर्षग्रस्त बालकांकडुन दुचाकी वाहन चोरीचे चार गुन्हे उघडकीस

पुणे शहरांतील कोंढवा परिसराचे हद्दीत दुचाकी वाहनचोरीचे प्रकार अधिक झाले होते त्यांस आळा घालण्यासाठी कोंढवा पोलीस ठाण्याचे तपास पथकामधील पोलीस अधिकारी व कर्मचारी अहोरात्र तपास करीत असताना उपलब्ध माहितीचे आधारे विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता सदर बालकाने दुचाकी चोरीबाबत गुन्हयाची कबुली दिली त्याचे कडुन पोलीस ठाणे कडील अभिलेखावरील कोंढवा पोलीस ठाणे कडील ३ हडपसर पोलीस ठाणे कडील ०१ असे मिळुन वाहनचोरीचे एकुण चार गुन्हे तपासपथकामधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी उघडकीस आणले आहेत सदर गुन्हयांतील विधीसंघर्षग्रस्त बालक यांस ताब्यात घेवुन त्याचे पालकाना सदर घटनेची माहिती देत विधीसंघर्षग्रस्त बालकाला पालकांचे ताब्यात दिले पोलीसांना उपलब्ध माहिती नुसार कोंढवा पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील वाहन चोरीच्या गुन्हयाचा कोंढवा पोलीस ठाणेच्या तपासपथकांतील  पोना पांडुळे पोशि शेख पोशि शेलार तपास करीत असताना सुत्रांकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांस सापाळा रचुन ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता त्याने दुचाकी वाहन चोरीचे चार गुन्हे केल्याचे कबुली देत त्याचे कडुन खालील प्रमाणे दुचाकी वाहन चोरीचे चार गुन्हे तपास पथकांतील पोलीसांनी उघडकीस आणले

| .अ.क्र | पोलीस ठाण्याचे नाव व गुरन | वाहनाचा प्रकार व क्रमांक |
|---|---|---|
| १. | कोंढवा पोलीस ठाणे ७४६/१९ भादवि कलम ३७९ | सुजुकी ॲक्सेस एम एच १२-एन एम-७७०१ |
| २. | कोंढवा पोलीस ठाणे ६७३/१९ भादवि कलम ३७९ | होंडा शाईन एम एच १२- एल एल-२५४६ |
| ३. | कोंढवा पोलीस ठाणे ३४९/१९ भादवि कलम ३७९ | होंडा डीओ एम एच १२- पी एफ ५२५६ |
| ४. | हडपसर पोलीस ठाणे ८६५/१७ भादवि कलम ३७९ | होंडा शाईन एम एच १२- एच एस-९९८९ |

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ-५ पुणे शहर श्री सुहास बावचे,सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री सुनिल कलगुटकर कोंढवा पोलीस ठाण्याचे वपोनि श्री अनिल पाटील कोंढवा पोलीस ठाण्याचे पोनि गुन्हे महादेव कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली व सुचने प्रमाणे सपोनि चेतन मोरे पोउनि संतोष शिंदे सपोफौ ईक्बाल शेख पोना पांडुळे पोना कुंभार पोशि शेख पोशि स्वामी पोशि शेलार यांनी केलेली आहे

(मुरलीधर करपे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर